महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असलेल्या भारतीय सैन्यदलातील शौर्यपदक व सेवापदक धारकांना पुरस्कार म्हणून देण्यात येणारे एकरकमी रोख अनुदान तसेच मरणोत्तर शौर्यपदक धारकांच्या विधवा/अवलंबितांना आर्थिक मदत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मासैम-२०२५/प्र.क्र.३११(भाग-१)/२८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ३१.०३.२०२६

**वाचा:** शासन निर्णय, सा.प्र.वि., क्रमांक: मगौपु-२०१७/प्र.क्र.३६०/२८, दि. ३१/०१/२०१९

**प्रस्तावना:-**

०१. महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असलेल्या भारतीय सैन्यदलातील शौर्यपदक व सेवापदक धारकांना पुरस्कार म्हणून देण्यात येणारे एकरकमी रोख अनुदान तसेच मरणोत्तर शौर्यपदक धारकांच्या विधवा/अवलंबितांना देण्यात येणारे मासिक अनुदान या आर्थिक मदतीपैकी ५०% रक्कम शासकीय अनुदानातून व उर्वरित ५०% रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता (कारगील) निधीमधून घेण्यात आलेल्या व राष्ट्रीयकृत बँकेत गुंतविण्यात आलेल्या मुदत ठेवीच्या रकमेवरील व्याजातून देण्याची तरतूद आहे.

०२. मुख्यमंत्री सहायता (कारगील) निधीमध्ये येणारी रक्कम ही केवळ राष्ट्रीयकृत बँकात गुंतविलेल्या मुदत ठेवींच्या व्याजातून होत होती. या व्याजाव्यतिरिक्त इतर कोणतेही मिळकतीचे पर्याय उपलब्ध नसल्यामुळे व व्याजाची रक्कम ही खर्चाच्या रकमे पेक्षा अपूरी पडत असल्यामुळे मुख्यमंत्री सहायता (कारगील निधीमधून मुदत ठेवीत रकमा गुंतविल्यानंतर मुदतपूर्तीनंतर पुन्हा ठेवी करता आल्या नाहीत व मिळालेल्या ठेवीची मुद्दलाची रक्कम खर्च करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत मुख्यमंत्री सहायता (कारगील) निधीमधील रक्कम संपुष्टात येत असल्याने वरील योजनांसाठी शासकीय निधीतून १०० टक्के अर्थसहाय्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

**०३.** महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असलेल्या भारतीय सैन्यदलातील शौर्यपदक व सेवापदक धारकांना पुरस्कार म्हणून देण्यात येणारे एकरकमी रोख अनुदान तसेच मरणोत्तर शौर्यपदक धारकांच्या विधवा/अवलंबितांना देण्यात येणारे मासिक अनुदान या योजनेअंतर्गत खालील नमूद लाभार्थ्यांस पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | शौर्य/सेवापदक धारकाचे नाव | प्राप्त शौर्य/सेवापदक व पदक प्राप्त झाल्याचा दिनांक | अनुज्ञेय (रुपये) रक्कम- (१००% शासकीय निधीतून |
|---|---|---|---|
| १ | ग्रुप कॅप्टन गुणज्ञ रमेश खर्चे | मेन्शन इन डिस्पॅच पदक (शौर्यपदक) दि.१५.०८.२०२५ | ६,००,०००/- |
| २ | एअर व्हाईस मार्शल प्रदीप अरूण शाह | अति विशिष्ट (सेवा पदक) दि.२६.०१.२०२४ | २,००,०००/- |
| ३ | लेफ्टनंट कर्नल महेशसिंग रामशंकरसिंग ठाकूर | सेना मेडल (शौर्यपदक) दि.१५.०८.२०२५ | १२,००,०००/- |
| ४ | मेजर जनरल आशीष रमेश सिरसीकर | विशिष्ट (सेवा पदक) दि.२६.०१.२०२४ | १,००,०००/- |
| ५ | रिअर ॲडमिरल राहूल विलास गोखले | नौसेना पदक (सेवा पदक) दि.२६.०१.२०२१ | १,५०,०००/- |
| | एकूण | | २२.५० लक्ष |

०४. सदरील लाभार्थ्यांना अनुज्ञेय आर्थिक मदत "मागणी क्र.ए-४, प्रधानशीर्ष - २०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा- ८०० इतर खर्च (००) (०५) शौर्यासाठी पारितोषिके (अनिवार्य) -०५- बक्षिसे (२००५०११३) या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर अनुदानातून खर्ची करण्यात यावी.

०५. प्रथमत: मा. मुख्यमंत्री सहायता (कारगील) निधी मधील शिल्लक रक्कम खर्च करण्यात यावी.

०६. या प्रकरणी लाभार्थ्यांच्या निवासी पत्त्यानुसार 'आहरण व संवितरण अधिकारी, म्हणून जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, ठाणे/मुंबई/पुणे. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

०७. सदर आर्थिक मदत ECS द्वारे देण्यात यावी व सदरहू शासन निर्णयांत दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

०८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.९९/व्यय-४ दि.१२.२.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३३११९०३०७२७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

URMILA POPAT SAWANT

Digitally signed by URMILA POPAT SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=532e1c167ebaaff43f5811aa7e45b8f790eb47c4f4cdf5bad586d61ab9901df2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C586C9348CA72192AB033313815E031BC4374F8A3A8575A392F3FE875E8661EC, cn=URMILA POPAT SAWANT
Date: 2026.03.31 19:03:58 +05'30'

**(उर्मिला सावंत)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई,
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई,
३. महालेखापाल (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा) महाराष्ट्र, मुंबई-३२,
४. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे-४११००१.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/मुंबई/पुणे.
६. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, ठाणे/मुंबई/पुणे.
७. ग्रुप कॅप्टन गुणज्ञ रमेश खर्चे, मु.पो.ए-१५, क्रांती टॉवर, श्रीनगर कॉम्प्लेक्स, वागळे इस्टेट, ठाणे-४०० ६०४
८. एअर व्हाईस मार्शल प्रदीप अरूण शाह,२०३ सोनमर्ग,मुख्य कस्तुरबा मार्ग, संजय गांधी राष्ट्रीय पार्क जवळ, बोरीवली ईस्ट, मुंबई-४०० ०६६.
९. लेफ्टनंट कर्नल महेशसिंग रामशंकरसिंग ठाकूर,३८ वायरलेस कॉलनी, औंध रिलायन्स मार्टच्या मागे, पुणे-४११ ००७.
१०.मेजर जनरल आशीष रमेश सिरसीकर,मिडओ ५०२, फेज-१ सर्व्हे नं.२६/४, एनआयबीएम, उंड्री रोड, कोंढवा, हवेली, पुणे-४११ ०४८
११.रिअर ॲडमिरल राहूल विलास गोखले,१२ सोपानबाग,घोरपडी गाव, पुणे-४११ ००१.
१२.सह संचालक, लेखा व कोषागार, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई ३२,
८. वित्त विभाग (व्यय ४) ,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन २५, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०.निवड नस्ती (२ प्रती),
११.संग्रहार्थ.